



हे लहानसे , सहज वागवता येण्याजोगे पुस्तक (पेंग्विन प्रकाशन) म्हणजे जिहादी मानसिकतेचे सुसंगत खंडण व इस्लाम योग्य जाणून घेणाऱ्यासाठी मार्गदर्शक आहे. – द टाईम्स ऑफ इंडिया (एसटी)

घालून तिच्यामार्फत शांतीची संस्कृती या संकल्पनेला खतपाणी घालणे हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे. हे केंद्र आणि जगभरातील व त्याच्या शाखांमार्फत मौलानांनी जगभर शांतीचा संदेश पोहोचवण्यासाठी शांती आणि अध्यात्माच्या दूतांचे संघटन बांधले. त्यांच्या विचारांना नव्याने आकार दिला. त्यांनी हे ईश्वराभिमुख आयुष्य जगून अध्यात्माच्या सहाय्याने स्वतःला बदला, म्हणजे तुम्ही जग बदलू शकाल असे त्यांना सांगितले. त्यांच्या मते, शांती आणि अध्यात्माच्या दूतांची भूमिका वठवणाऱ्या या व्यक्ती जगाला शांती आणि एकतेच्या दुनीयेत नेतील. शांतीपूर्ण जग हे मौलानांचे स्वप्न आहे. अशा अध्यात्मिक व्यक्ती पुरेशा संख्येने एकत्र आल्या तर शांतीपूर्ण समाज अस्तित्वात येईल असा त्यांना विश्वास आहे.

मौलाना या शांतीदूतांच्या मार्फत– शांती आणि आध्यत्म केंद्र व त्यांच्या जगभरातील शाखा याद्वारे शांतीचे महान कार्य जागतिक पातळीवर राबवत आहेत. त्यांच्या अध्यात्मिक थोरवीच्या प्रेरणेने हे शांतीदूत उपलब्ध असलेल्या सर्व माध्यमांचा वापर करून शांतीचा संदेश जगत सर्वदूर पोहोचवत आहेत. थेट संवाद, व्याख्याने, परिषदा, परिसंवाद, पुस्तके, पुस्तिका व प्रक्षेपणे (इंटरनेटचा वापर) आणि रेडीओ व दूरदर्शनसारख्या माध्यमांचा उपयोग करून हे शांतीचे कार्य करण्यात येत आहे. प्रत्यक्षात शांती आणि अध्यात्मिकतेचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात आणि प्रत्येक घरात नेऊन जागतिक शांती आणि अध्यात्माचे युग आणणे हे या शांतीदूतांनी अंगिकारलेले महान कार्य आहे.

मराठी पत्रक मिळण्याचे ठिकाण :- अब्दुर्रऊफ अब्दुल्लाह खतीब,
C/o. चिपळून मोझाइक टाईल्स, प्लाट नं. अ–१४,
एम.आय.डी.सी. खेर्डी – ४१५६०४, चिपळून, महाराष्ट्र
मो. ९८५०५२७०३७/ ९४२०५२७३९९/०२३५५–२५६५९८/२५३१६६.

✻ मराठी भाषांतरकार ✻
ज्योती आफळे

CPS International
centre for peace & spirituality

Center for Peace and Spirituality USA
2665 Byberry Road, Bensalem, PA 19020
Cell : (617) 960-7156, cps@alrisala.org

Center for Peace and Spirituality
1, Nizamuddin West Market, New Delhi -110013
Email : info@cpsglobal.org
**www.cpsglobal.org**
**www.alquranmmission.org**
**www.spiritofislam.co.in**

Goodword

Goodword
1, Nizamuddin West Market, New Delhi -110013
Mobile : 9111-4182-7083, 91-8588822672
Email : info@goodwordbooks.com

Goodword Books, Chennai
82/324, Triplicane High Road, Chennai-600005
Mob. +91-9600105558
**www.alrisala.org**
**www.goodwordbooks.com**



वॉशिंग्टन डीसी येथील जॉर्ज टाऊन विश्वविद्यालयाने प्रकाशित केलेल्या पुस्तकात २००९ सालातील, ५०० सर्वाधिक प्रभावशाली मुस्लिम या पुस्तकात मौलाना वहीदुद्दीन खान यांना 'इस्लामचा अध्यात्मिक विश्वदूत' म्हणून गौरवले आहे. जागतिक शांततेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. डेमर्गस आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्कार, पद्मभूषण, राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय नागरिक पुरस्कार यातून त्यांच्या कार्याला जागतिक पातळीवर स्थान मिळाले आहे.

# मौलना वहिदुद्दिन खान

मौलाना वहीदुद्दीन खान यांचा जन्म १९२५ साली उत्तर प्रदेशातील आझमगड येथे झाला. त्यांचे शिक्षण इस्लामिक विद्यालयात झाले. अगदी बालपणापासून त्यांना आधुनिक ज्ञानाची विलक्षण भूक होती. ती भागवण्यासाठी ते दिवसभर वाचनालयात जात असत. अभिजात इस्लामिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान या दोहोत त्यांनी प्राविण्य मिळवले. त्यातून त्यांची संशोधन वृत्ती वाढीस लागली आणि समकालीन संदर्भातून इस्लामची शिकवण मांडण्याची गरज त्यांना जाणवली. तेव्हापासून त्यानी आपले जीवन समकालीन विचारांचा वेध घेण्यासाठी आणि इस्लामला शांतीची संपूर्ण विचारप्रणाली म्हणून पेश करण्यासाठी वाहिले आहे.


त्यांच्या अपार अभ्यासाचे फलित म्हणजे 'नये अहद के दरवाजे पर' हा त्यांचा ग्रंथ. 'इल्मे जदीद का चॅलेंज'– 'इस्लाम आणि अधुनिक आव्हाने' या ग्रंथातनू त्यांनी हे विचार अधिक सविस्तर मांडले. नंतर ते 'God Arises' या पुस्तकातून प्रसिद्ध झाले. हे पुस्तक आधुनिक विचारांबाबतची इस्लामची प्रमाण भूमिका मानले गेले. अनेक अरब देशांमधील विश्वविद्यालयांच्या अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला गेला. इंग्रजी, अरेबिक, मल्याळम, तुर्किश, हिंदी, आणि सिंधी अशा विविध भाषांमध्ये या पुस्तकाचे अनुवाद झाले. याची अरेबिक आवृत्ती 'अल–इस्लाम यत्तअहद्दा' या

शीर्षकासह प्रसिद्ध झाली. प्रत्येक समाजाने आणि समाजाच्या प्रत्येक थराने या लिखाणाचे स्वागत केले आहे.

भारतात तसेच परदेशामधील आंतरधर्मीय परिषदांमध्ये त्यांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित केले जाते. १९६७ सालापासून अनेक सार्वजनिक व खासगी सभांमधून ते शांतता व सुसंवाद यावर आधारित धोरणाची शिफारस करत आहेत. इस्लामचे शांतीपूर्ण व सहनशील रूप जगासमोर आणण्यासाठी ते कठोर परिश्रम घेत आहेत. शांतता व एकता साध्य करण्याच्या चळवळीत त्यांचा सक्रीय सहभाग आहे.

मौलानांनी जगप्रवास केलेला असून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांवर त्यांनी आपले नाव कोरले आहे. निरनिराळ्या देशांमधील आण्विक संघर्षाचा धोका टाळण्यासाठी अविरत आणि अथक परिश्रम घेऊन जगात शांतता टिकवण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. आण्विक निःशस्त्रीकरणाच्या जागतिक चळवळीचा भाग म्हणून इ.स. २००२ साली स्वित्झर्लंडमधील झग येथे एक शांती परिषद पार पडली. या परिषदेत मौलानांनी त्यांचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावासाठी जागतिक निःशस्त्रीकरण मंचाने त्यांना 'डेमर्गस आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्कार' देण्यात आला. आधुनिक मनाला साद घालणाऱ्या इस्लामची शिकवण त्यांनी जगाला उलगडून दाखवली आणि मोठ्या कष्टाने शांतीची परिपूर्ण विचारप्रणाली विकसित केली. याद्वारे राष्ट्राराष्ट्रांमधील शांतीचे बंध बळकट करण्यात त्यांना यश मिळाले. या प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना दाद देण्यासाठी हा पुरस्कार दिला गेला. कोरियातील आंतरराष्ट्रीय विश्वशांती मंचाने शांतीदूत पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला आहे. त्यांना सन्मानित केलेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये पद्मभूषण, राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, सामाजीक एकात्मता पुरस्कार, दिवालीबेन मोहनलाल मेहता पुरस्कार, राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, दिल्ली गौरव पुरस्कार, एफआयइ मंच पुरस्कार, उर्दू अकादमी पुरस्कार, अरूणा असफअली सद्भावना पुरस्कार आणि राष्ट्रीय नागरिक पुरस्कार यांचा समावेश होतो. राष्ट्रीय नागरिक पुरस्कार त्यांना मदर तेरेसांच्या हस्ते मिळाला होता. वॉशिंग्टन डीसी येथील जॉर्जटाऊन विश्वविद्यालयाने प्रसिद्ध केलेल्या २००९ सालातील ५०० सर्वाधिक प्रभावशाली मुस्लीम या पुस्तकान मौलाना वहीदुद्दीन खान यांना इस्लामचा आध्यात्मिक विश्वदूत म्हणून गौरवले आहे. त्यांचा दृष्टिकोन मुस्लीम आणि बिगरमुस्लीम अशा सर्व भारतियांमध्ये लोकप्रिय आहे. असे या पुस्तकात म्हटले आहे.

त्यांच्या संशोधनाचा कळस म्हणजे 'अल्-इस्लाम' हे त्यांचे पुस्तक. यातून त्यांनी शांतीआधारित आधुनिक चौकटीतून इस्लामच्या धर्मग्रंथांमधील धारणा स्पष्ट केल्या आहेत. तिथपासून आजवर त्यांनी




प्रेषितांचे विचार आणि बहुवांशिक समाजातील शांतीपूर्ण सहजीवन यावर २०० हून जास्त पुस्तके लिहिली. शांतीची विचारप्रणाली, सच्चा जिहाद आणि इस्लाम व शांती ही त्यातील काही उदाहरणे आहेत. त्यांचे अलीकडे प्रकाशित झालेले पुस्तक म्हणजे शांतीचे प्रेषित : प्रेषित मुहम्मदांच्या शिकवणी. पेंग्वीन प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकातून त्यानी जिहादी मानसिकतेचा कालसुसंगत विरोध केला आहे. दहशतवादाच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी ते शांतीची विचारधारा देऊ करतात. इस्लाम योग्य रीतीने जाणून घेणाऱ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरावे.

कुरआन आणि हदीसचे अचूक भाषांतर व त्यावरील भाष्य यांची गरज ओळखून त्यांनी 'तज़किरूल कुरआन' या नांवाने कुरआनचे उर्दू भाषांतर प्रसिध्द केले. 'द कुरआन' या त्यांच्या इंग्रजी भाषांतरातून कुरआनचे सोप्या व समकालीन इंग्रजीमध्ये स्पष्टिकरण मिळते.

या सकारात्मक भावना सार्थपणे व्यक्त करण्यासाठी त्यांनी इस १९७० मध्ये नवी दिल्ली येथे इस्लामिक केंद्र स्थापन केले. त्यानंतर १९७६ साली अल्-रिसाला हे या केंद्राचे मुखपत्र म्हणून सुरू केले. या नियतकालिकात फक्त त्यांचे स्वतःचे लेख असतात. उर्दू-भाषिक जगात त्याचा झपाट्याने प्रसार झाला. इस्लामचा शांतीपूर्ण चेहरा समजण्यात, मुस्लिमांमध्ये त्यांच्या सामाजिक जबाबदारीच्या नव्या जाणीवा जागवण्यात आणि त्यांच्या सकारात्मक आचारविचारांना चालना देण्यात या नियतकालिकाची इंग्रजी आवृत्ती व हिंदी आवृत्ती अनुक्रमे फेब्रुवारी १९८४ व डिसेंबर १९९० मध्ये सुरू करण्यात आली. अध्यात्मिक संदेश या नावाने इंग्रजी आवृत्ती प्रकाशित करण्यात येत होती. आज ही आवृत्ती दि स्पिरिट ऑफ इस्लाम **The spiritual Message** इस्लामचे चैतन्य या नावाने प्रकाशित केली जाते.

कालांतराने ते अनेक नियतका – लिकांसाठी लिहू लागले आणि तेव्हापासून अनेक राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय दैनिकांचे व मासिकांचे नियमित सहयोगी बनले. शांतीची संपूर्ण विचारधारा विकसित करण्यासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले आहे. शांती, संयम आणि सहजीवन ईश्वराच्या निर्मिती योजनेचे स्पष्टीकरण देऊन लोकांना त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट समजून देण्यात त्यांनी मदत केली.

शांतीचे समर्थन आणि परस्पर विश्वासाच्या हेतूंचा स्वीकार यामुळे ते सर्वत्र आदरणीय ठरले. शांतीचे हे जीवनकार्य तेवते ठेवण्यासाठी मौलना वहीदुद्दीन खान यांनी २००१ साली नवी दिल्ली येथे शांती आणि अध्यात्म केंद्र (सेंटर फॉर पीस अँड स्पिरिच्युॲलिटी, सीपीएस) स्थापन केले. संघटनेच्या या नावावरून स्पष्ट होते की, मनात लपलेल्या अध्यात्मिकतेला साद



मौलाना वहीदुद्दीन खान, डावीकडून तिसरे, १९९५ सालच्या जेरूसलेम येथील सर्वधर्मीच शांती परिषदेत ऑलीव्हचे झाड लावताना.